International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 40 September - October - 2025

# आदिवासी पारधी जमातीची स्वशासन व्यवस्था (जातपंचायत)

**डॉ. आण्णासाहेब हं. सोनवणे**
*पोस्ट डॉक्टरेट फेलो,*
*आय. सी. एस. एस. आर., नवी दिल्ली.*
*Corresponding Author – डॉ. आण्णासाहेब हं. सोनवणे*
**DOI - 10.5281/zenodo.17656741**

**प्रस्तावना :**

महाराष्ट्रासह देशात अनेक वेगवेगळ्या जाती, धर्माचे आणि वंशाचे लोकसमूह राहतात. त्यापैकी बरेच लोकसमूह सामाजिक दृष्ट्या स्थिर जीवन जगतात. तर काही लोकसमूह आजही अस्थिर म्हणजेच निर्वासित जीवन जगतात. जे निर्वासित जीवन जगतात त्या लोकसमूहाला भटका म्हणून ओळखले जाते. हा भटका समाज गेल्या कित्येक वर्षापासून उदरनिर्वाह करण्यासाठी सतत भटकंती करताना दिसतो. या भटक्या जमातीला ना स्वतःचे घर, ना स्वत:चे गाव. गावगाड्याच्या आश्रयाने गावकुसाबाहेर पालं ठोकून 'उपरा' म्हणून ही जमात वास्तव्य करते. अशा परिस्थितीतही या जमातींनी आपले सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक वेगळेपण प्रचंड श्रद्धेने जपले आणि जोपासले आहे. या जमातींनी जमातनिहाय स्वशासन व्यवस्था निर्माण करून आपल्या जमातीचे अंतर्गत न्यायनिवाडे केलेले आहेत.

या भटक्या जमातींपैकीच ‘पारधी’ ही एक भटकी जमात आहे. ‘जन्मताच चोर’ हा सरकारी कलंक घेऊन जगणारी ही जमात महाराष्ट्राच्या बहुतांश जिल्ह्यात कमी - अधिक प्रमाणात आढळते. या जमातीत अनेक वेगवेगळ्या पोट जमाती आहेत. तसेच या पोटजमातींचे स्वतंत्र कुळ, गोत्र आहे. इतर भटक्या जमातींप्रमाणेच पारधी जमातीनेही आपले सामाजिक आणि सांस्कृतिक वेगळेपण टिकून ठेवलेले आहे. स्वजातीय लोकांचा अंतर्गत न्यायनिवाडा करण्यासाठी या जमातीने स्वतःची स्वतंत्र स्वशासन व्यवस्था निर्माण केलेली आहे. त्या स्वशासन व्यवस्थेला ‘जातपंचायत’ म्हणून ओळखले जाते.

**स्वशासन व्यवस्थेचे (जातपंचायतीचे) स्वरूप:**

प्रत्येक भटक्या मुक्त जमातींची एक स्वतंत्र स्वशासन व्यवस्था आहे. या शासन व्यवस्थेला त्या त्या जमातीमध्ये विशेष असे महत्त्व आहे. जातपंचायतीला सामाजिक न्यायालय म्हणूनही ओळखले जाते. या सामाजिक न्यायालयात केवळ न्याय निवाडा होत नाही, तर त्या त्या जमातीचे जीवन विषयक नियम ठरविले जातात. या नियमांचे काटेकोर पालन करणे त्या त्या जमातीतील लोकांना बंधनकारक असते. या जमातींचे स्वतंत्र न्यायालय नाही. परंपरेने चालत आलेली जातपंचायतच न्यायालय म्हणून न्यायदानाची कार्य करते.

पारधी जमातीतही परंपरेने चालत आलेली अशीच जातपंचायत अस्तित्वात आहे. या

जातपंचायतीच्या माध्यमातूनच पारधी जमातीमधील अंतर्गत तंट्यांचा न्याय निवाडा केला जातो. एक पाटील आणि अकरा पंच अशी या जातपंचायतीची रचना असते. “जातपंचायतचा प्रमुख एक पाटील आणि इतर अकरा पंच मिळून बारा व्यक्ती न्यायनिवाड्याचे काम करतात”१ असे भटक्या विमुक्तांच्या जातपंचायतीचे अभ्यासक रामनाथ चव्हाण यांनी म्हटले आहे.

पारधी जातपंचायतीचे स्वरूप आणि पंचांची संख्या यासंदर्भात बाळासाहेब बळे यांनी ही आपल्या ‘पारधी समाज लोकजीवन आणि संस्कृती’ या ग्रंथात नोंद घेतलेली आहे. ती अशी “जात जातपंचायतीमध्ये पाटील (न्यायाधीश) व पाच पंच अशा सहा व्यक्तीही न्यायनिवाड्याचे काम करू शकतात. पारधी जमातीतील आर्थिकदृष्ट्या सुधारलेल्या, व्यवहारात निपुण समजल्या जाणाऱ्या प्रतिष्ठित व्यक्तींची पंच म्हणून निवड करण्यात येते. काही ठिकाणी पंचांचा हा मान वंशपरंपरागत चालत आलेला असतो. आपल्या बापदादांनी समाजामध्ये एकोपा नांदावा यासाठी जे समर्पण दिले, याचा पंच असलेल्या त्यांच्या मुलाला रास्त अभिमान असल्यामुळे तेही पंचांचे नियम कठोरपणे अमलात आणत असतात. पंचांनी न्याय भूमिका घेतली नाही, तर या पदावरून पंचाला कमी करून केलेल्या अन्यायाबद्दल त्याला जातपंचायतीत शिक्षा ठोठवण्याची तरतूद जातपंचायतीमध्ये असते”२ त्यामुळे सत्यासत्याची पडताळणी करूनच पंचांना योग्य तो निवाडा करावा लागतो. जातपंचायतीमध्ये वादी आणि प्रतिवादी यांना आपली बाजू मांडण्याची मुभा दिली जाते. दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर दोशीला गुन्ह्याची तीव्रता आणि त्याचे स्वरूप यावरून शिक्षा किंवा नगदी पैशाच्या स्वरूपात दंड ठोठावला जातो. जातपंचायतीने दिलेल्या शिक्षेचे पालन करणे आणि ठोठावलेल्या दंडाची रक्कम भरणे, देणे अनिवार्य असते.

भारतीय न्यायव्यवस्थेच्या रचनेप्रमाणेच पारधी जमातीच्या जातपंचायतीची स्थानिक जातपंचायत, सेशन कोर्ट, हायकोर्ट आणि सुप्रीम कोर्ट अशी रचना केली असते. या जमातीचे सेशन कोर्ट बारामतीला तर हायकोर्ट पुण्याला आणि सुप्रीम कोर्ट अहमदनगर जिल्ह्यातील मढी या ठिकाणी आहे, असे सांगितले जाते. पारधी जमातीच्या न्याय निवाड्यात पुरुषांप्रमाणे स्त्रियांनाही सामावून घेतले जाते. स्त्रिया पंच, न्यायाधीश आणि वकील म्हणून न्याय निवाड्यात काम करू शकतात. इतर भटक्या विमुक्त जमातीच्या तुलनेत पारधी जमातीचे आणि त्यांच्या जातपंचायतचे हे एक विलक्षणीय वेगळीपण आहे.

**जातपंचायतीचे ठिकाण:**

पारधी जमातीत जातपंचायतीच्या ठिकाणांना अत्यंत पवित्र मानले जाते. पारधी वस्ती पासून काहीशा अंतरावर एखाद्या झाडाखाली जातपंचायत भरवली जाते. ते ठिकाण झाडून स्वच्छ केले जाते. त्या ठिकाणाची प्रतिष्ठा आणि पावित्र्य राखण्यासाठी कुलदैवताची तात्पुरती प्रतिष्ठापना केली जाते. एका अर्थाने पारधी जातपंचायतीच्या ठिकाणाला सामाजिक आणि धार्मिक अधिष्ठान निर्माण केली जाते. पारधी जातपंचायतीची ही ठिकाणे परंपरागत ठरलेली आहेत. महाराष्ट्रातील पाथर्डी, जेजूरी, बार्शी, सोनारी, मढी, बारामती, परांडा, करमाळा, खर्डा, आडूळ, लासूर, देवगाव इत्यादी ठिकाणी जातपंचायत बोलाविली जाते. तसेच यात्रेच्या ठिकाणी आणि जवाहरणो या देवदेव कार्यक्रमाच्यावेळी पारध्यांची जातपंचायत हमखास भरवली जाते. जमाती अंतर्गत कलहाच्या वेळी

पूर्वनियोजन करून जातपंचायतीची बैठक बोलाविली जाते.

**निवाड्यासाठी आलेल्या गुन्ह्यांचे स्वरूप:**

व्यवहारातील देणे – घेणे, व्यावसाय, संबंधातील भांडणे, मान – पान, चोरी नाकारणे, विवाह विषयक समस्या, अनैतिक संबंध, राखणीच्या हद्दी, लबाडी या आणि अशा अंतर्गत कलहांसाठी पारध्यांमध्ये जातपंचायत बसविली जाते. “पारध्या - पारध्यांमधील व्यवहारातील रक्कम बुडविणे, एखाद्याने बायको सोडून देणे, मुलीच्या बापाला हुंडा न देणे, मुलीने दुसरा घरोबा करणे, विधीवेने मोहतूर न लावता दुसऱ्या कुळातील पुरुषाबरोबर राहणे, चोरी बद्दल कागाळी करणे, स्वतः चोरी करून दुसऱ्याचे नाव सांगणे, चोरीतील मालात योग्य वाटणी न देणे, चोरी करताना एखादा पारधी - पारधीन पकडली आणि बाकीचे पळून गेले तर त्यांनी पकडलेल्या पारध्यांच्या कोर्टकचेरीची रक्कम न देणे, मुलीच्या बापाने मुलीला नवऱ्यापासून घेऊन जाणे, पहिल्या नवऱ्याची रक्कम न देता मुलीचा दुसरा विवाह लावून देणे, बायको गहाण टाकल्यानंतर झालेल्या मुलांसंदर्भातील व पैशासंदर्भातील वाद, व्यक्तिगत भांडणं तसेच लग्नाआधी मुलगी गरोदर राहणे, जातीबाह्य विवाह करणे, इच्छा नसताना जातीतील स्त्रीशी असभ्य वर्तन करणे, अनैतिक संबंध ठेवणे, जातीतील पुरुषाने लुगड्याखालून जाणे, लुगडे उशाला घेऊन झोपणे, बाईने पुरुषाला लुगडं, दगड, काठीने, हाताने मारणे, चप्पल मारणे, अंगावर मानवी मूत्र शिंपडणे, जातीतील व्यक्तीचा खून करणे, अशा स्वरूपाचे न्यायनिवाडे जातपंचायतीमध्ये केले जातात.”३ असे बाळासाहेब बळे यांनी आपल्या ‘पारधी समाज लोकजीवन आणि संस्कृती’ या ग्रंथात म्हटले आहे.

**गुन्हा, शिक्षा आणि नगदी दंडाची स्वरूप:**

पारधी जमातीत जातपंचायतीच्या पंचांनी दिलेला निवाडा हा अंतिम मानला जातो. निवाडा किंवा न्याय देताना गुन्हेगारांनी केलेल्या गुन्ह्याची तीव्रता व त्याचे स्वरूप याची शहानिशा करून गुन्हेगाराला शिक्षा सुनावली जाते. काही गुन्ह्यात गुन्हेगाराला जातपंचायतीकडून फक्त शिक्षा सुनावली जाते. तर एखाद्या गुन्ह्यात रोख रकमेच्या स्वरूपात दंड आणि शिक्षाही सुनावली जाते. एखादा पुरुष अथवा स्त्री आपला गुन्हा कबूल करत नसेल, तर त्याला पारंपारिक दिव्याची करण्याची शिक्षा दिली जाते. कवडीचा दंड (हा पारधी जमातीत अत्यंत अपमानास्पद मानला जातो.) आणि जमातीतून बहिष्कृत करणे इत्यादी शिक्षाही गुन्हेगाराला सुनावल्या जातात. “न्यायाच्या सिद्धतेसाठी काही वेळा पंच उकळत्या तेलातून पैसा काढणे, तापलेली कुराड हातावर घेणे अशी काही दिव्यंही करावयास लावतात. दिव्य पार पडले तर आरोपीची निर्दोष मुक्तता होते. दिव्य केले नाही तर त्या आरोपीने गुन्हा कबूल केला आहे असे गृहीत धरून पंच न्याय देतात. दंड भरला नाही तर दोषी व्यक्तीला जातिबहिष्कृत करण्याची शिक्षा पंच ठोठावतात.”४ तेलातून पैसा काढणे, कुऱ्हाड हातावर घेणे ही आणि अशा सारखी दिव्य ही नैतिकतेशी संबंधित गुन्ह्यासाठी जात पंचायतीकडून वापरली जातात.

**तेलातून पैसा काढणे:**

आरोपीचा खरे खोटेपणा सिद्ध करण्यासाठी या दिव्याचा वापर करतात. भटक्या ा मुक्तांच्या जातपंचायतीची अभ्यासक रामनाथ चव्हाण यांनी या दिव्याला ‘तेल कढाई’ असे म्हटले आहे. हे दिव्य आरोपीला कशा पद्धतीने करायला लावतात. हे सांगताना ते म्हणतात की, “खऱ्या खोट्याचा न्याय

निवाडा करण्यासाठी तेल कढईचा वापर या जमातीत केला जातो. कढईतील उकळत्या तेलात तांब्याचा एक पैसा टाकून तो तेलातून काढण्यास सांगितले जाते. विशेषतः एखादी व्यक्ती आपला गुन्हा मान्य करत नसेल तर अशा वेळी तो गुन्हेगार नाही हे सिद्ध करण्यासाठी त्याला उकळत्या तेलातून पैसा काढण्यास पंचायत सांगते. त्याने जर तेलातून पैसा काढला आणि त्याला भाजले नाही तर तो निर्दोष आहे असे समजून त्याला सोडून दिले जाते."५ या दिव्याचा परिणाम आणि त्याची दाहकता लक्षात घेऊन आरोपी शक्यतो खोटे बोलणे टाळत असे.

**तप्त कुऱ्हाड हातावर देणे:**

आरोपीला आपले निर्दोषत्व सिद्ध करण्यासाठी या दिव्याला सामोरे जावे लागते. या दिव्यामध्ये "आरोपी व्यक्तीच्या हाताला पिंपळाचे सात पाने दोऱ्याने बांधतात व हातात लालभडक तापलेली कुऱ्हाड ठेवतात. कुराड घेऊन सात पावले चालायचे असते. हात भाजले, फोड आले किंवा कुराड वाटेतच सोडली तर दोषारोपित व्यक्ती गुन्हेगार ठरते."६ जर त्या आरोपीच्या हाताला भाजले किंवा फोड आले नाहीत आणि ती तप्त कुऱ्हाड हातात घेऊन सात पावले चालून त्याने ते दिव्य पूर्ण केले तर त्याला निर्दोष ठरविले जाते.

**धनुष्यबाणाची परीक्षा:**

पारधी जातपंचायत या दिव्याचा वापर केवळ पुरुष गुन्हेगारांसाठीच करते. या दिव्यामध्ये "आरोपी व्यक्तीला बाण सोडताक्षणी पाण्यात बुडी मारण्यास सांगितले जाते. दुसरा एक व्यक्ती पळत बाण परत घेऊन येतो. परत बाण आणेपर्यंत आरोपी व्यक्तीने पाण्यात श्वास कोंडून धरावयाचा असतो. तो आधीच वर आला तर त्याला गुन्हेगार समजले जाते."७ बाण घेऊन येणारी व्यक्ती येईपर्यंत आरोपी जर पाण्यात दम धरून राहिला तर जातपंचायत त्या आरोपीची निर्दोष मुक्तता करते.

**शेणाची दोन गोळे:**

पारधी जमातीतील एखादी मुलगी अथवा स्त्री जर लग्नाच्या आधीच गरोदर राहिलेली असेल तर तिचा निवाडा करण्यासाठी जातपंचायत या दिव्याचा किंवा परीक्षेचा वापर करते. "तिला जातीत ठेवायचे का जातबहिष्कृत करायचे हे ठरविण्यासाठी शेणाचे दोन गोळे करतात. एका गोळ्यात चांदीचा तुकडा ठेवतात व दुसऱ्या गोळ्यात कोळसा ठेवतात आणि त्या मुलीला पंचासक्षम कोणताही एक गोळा उचलावयास सांगतात. जर तिने चांदीचा तुकडा असलेला गोळा उचलला तर तिला जातीत ठेवण्याचा निर्णय घेतात आणि तिने जर कोळसा असलेला गोळा उचलला तर त्या मुलीला जातिबहिष्कृत करतात."८ तसेच ती मुलगी जातीतील पुरुषाकडून की परत जातीतील पुरुष करून गरोदर राहिली याची शहानिशा करून त्या मुलीला कोणती शिक्षा द्यायची हेही जात पंचायतीतील पंच ठरवतात.

**अघोरी शिक्षा:**

पारधी जमातीमध्ये काही गुन्ह्यात अतिशय अघोरी शिक्षा सुनावण्याची प्रथा आहे, ती प्रचंड विलक्षण आहे. ही अघोरी शिक्षा स्त्रियांना आणि पुरुषांनाही दिली जाते. पुरुषांपेक्षा स्त्रियांनाच ही शिक्षा अधिक प्रमाणात सुनावल्याची उदाहरणे जास्त आहेत. हे विशेष आहे. "जर जमाती मधील एखाद्या मुलाने पर स्त्रीशी संबंध ठेवला, तर जवळजवळ दीडशे लोक हातामध्ये वडाच्या फांद्या घेऊन असे कृत्य करणाऱ्यास माराची शिक्षा देत असत. स्त्रीने प्रजातीतील पुरुषाशी संबंध ठेवला तर तिचे नाक कापणे, केस कापणे, नखे उपटून काढणे इत्यादी अघोरी शिक्षा दिल्या जात

होत्या.''९ बलात्कार करणाऱ्या पुरुषाचे लिंग कापणे, डोक्यात दगड घालून जीवे मारणे अशा अघोऱ्या शिक्षाही जातपंचायत आरोपीला सुनावित असत. ''एखादी स्त्री अनैतिक वर्तन करत असेल; आणि तसे सिद्ध झाले, तर जातपंचायतीमध्ये त्या स्त्रीला आणून तिच्या डोक्यावर पुरुषांच्या मूत्राने भरलेले मडके देत व तिला सात फेरे मारायला लावत. असे फेरे चालू असताना बघे खडे मारून मडके फोडत.''१० पारधी पुरुषाने पारधी स्त्रीवर अन्याय केला असला, तरी त्या अन्यायग्रस्त स्त्रीलाच जातपंचायतीने अघोरी शिक्षा सुनावल्याची उदाहरणे संतोष पवार यांनी आपल्या 'पारधी जातपंचायत' या ग्रंथात दिलेली आहेत. यावरून पारधी जातपंचायतीकडून पारधी जमातीच्या स्त्रियांवर सातत्याने अन्याय होतो. असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

पारधी जमातीत जातपंचायतीकडून एखाद्या गुन्ह्यात आरोपीला ज्या पद्धतीने शिक्षा सुनावली जाते. तद्वतच नगदी पैशाच्या स्वरूपात दंडही ठोठावला जातो. गुन्ह्याचे स्वरूप आणि त्याची दाहकता यावरून दंडाची रक्कम आकारली जाते.

## जातिबहिष्कृत आणि कवडीचा दंड :

'जमातीतून बहिष्कृत करणे' आणि 'कवडीचा दंड होणे' या दोन शिक्षा पारधी जमातीत अत्यंत अपमानास्पद मानल्या जातात. ज्या आरोपीला पारधी जातपंचायतीने जमितीतून बहिष्कृत केल्याची शिक्षा सुनावली जाते त्या आरोपीशी जमातीतील कोणीही व्यक्ती कसलाही संबंध ठेवत नाहीत. एवढेच नाही तर बहिष्कृत व्यक्तीच्या घरातीलही त्याच्याशी कोणतेही संबंध न ठेवता जातीच्या निर्णयाचे पालन करतात.

ज्या व्यक्तीला कवडीच्या दंडाची शिक्षा झाली ती व्यक्ती आपल्याला झालेली ही शिक्षा रद्द करण्यासाठी जमीन आसमान एक करतो तसेच लाखाने नगदी दंड भरण्यास तयार होतो. या दंडातून आपला बचाव करण्यासाठी जमातीतील नामांकित वकिलाला भरमसाठ पैशाचा मोबदला देऊन जातपंचायतीसमोर आपली बाजू मांडण्यास सांगितले जाते. कवडीचा दंड याचा अर्थ त्या आरोपीला त्याच्या जमातीत कवडीचीही किंमत न राहणे.

## गुन्हा आणि त्यावर आकारलेली दंडाची रक्कम :

पारधी जातपंचायतीत एखाद्या गुन्ह्याच्या संदर्भात दंड आकारताना आरोपीने केलेला गुन्हा आणि त्या गुन्ह्याची तीव्रता लक्षात घेतली जाते. तसेच घडलेल्या गुन्ह्याच्या संदर्भात पारंपरिक जातपंचायतीने कोणती शिक्षा सुनावली किंवा किती दंड आकारला याच आधार घेतला जातो. असे असले तरी आरोपीने केलेला गुन्हा, त्या गुन्ह्याची शिक्षा आणि त्यावर किती दंड आकाराचा हे पारधी जातपंचायत येतील ठरलेले असे. भटक्या भक्तांच्या जातपंचायतीचे अभ्यासक रामनाथ चव्हाण यांनी आपल्या 'भटक्या विमुक्तांची जातपंचायत' या ग्रंथामध्ये पारधी जातपंचायतीकडून कोणत्या गुन्ह्याला कोणती शिक्षा सुनावली जाते आणि त्या गुन्ह्यावर नगदी स्वरूपात किती दंड आकारला जातो हे सांगितले आहे. ते असे ''१) हाताने मारले – २५० रुपये दंड, २) लाथ मारली – १५०० रुपये दंड, ३) चप्पल मारली – १५०० रुपये दंड, ४) दगडाने मारले – ५०० रुपये दंड ५) काठीने मारले – २५०० रुपये दंड, ६) चोरी करून पळाला व सापडला - कुत्र्याची किंवा गाईचे मटण खायला घालणे, ७) लघवी अंगावर टाकली – २५०० रुपये दंड.''११

याशिवाय त्यांनी विदर्भात आणि मराठवाड्यात पारधी जातपंचायतीकडून कोणत्या गुन्ह्याला कोणती शिक्षा आणि त्यावर किती रुपये दंड

आकारला जातो, हेही सांगितले आहे. "मारामारी केली किंवा मारले – ५०० रुपये दंड, २) चप्पल फेकून मारली – १२ रुपये दंड, ३) बाईच्या लुगड्याखालून गेला – १५० रुपये दंड, ४) अनैतिक संबंध ठेवला - कवडी दंड किंवा जातीबहिष्कृत करणे, ५) जोडा मारला – १० रुपये दंड."१२ बदलत्या परिस्थितीनुरूप आणि काळानुरूप या दंडाच्या रकमेमध्ये कमालीचा बदल झालेला दिसतो आहे. हा गुन्ह्यानिहाय दंडात्मक रकमेत झालेला बदल भाऊसाहेब राठोड यांनी सांगितलेले आहे. तो असा " हाताने मारणे ५०० रु; लाथ मारणे किंवा पायताणाने मारणे १०० रु; जननेंद्रियाला हात लावणे किंवा पकडणे २००० ते ३००० रु; हात, पाय तोडणे, डोळे फोडणे (हाफ मर्डर) १०,००० रु. स्त्रीचा हात पकडणे ७०,००० ते ८०,००० रु. खून करणे २,००,००० रु."१३ जातपंचायतीने सुनावलेली शिक्षा आणि दंडात्मक नगदी रक्कम अदा करणे याची अंमलबजावणी तात्काळ केली जाते.

देश, काल, परिस्थितीनुसार पारधी जातपंचायतीकडून सुनावल्या जाणाऱ्या शिक्षा आणि नगदी दंड यामध्ये कमालीचा बदल झालेला आहे.

**समारोप :**

समजिक आणि संस्कृती दृष्ट्या पारधी जमातीने आपले वेगळेपण ज्या पद्धतीने टिकवून ठेवलेले आहे. त्या वेगळेपणात पारधी जमातीने स्वजातीय लोकांच्या अंतर्गत कलहांचा न्याय - निवाडा करण्यासाठी निर्माण केलेल्या स्वशासन व्यवस्थेने (जातपंचायतीने) प्रचंड मोलाची भर घातलेली आहे. या जमातीत जातपंचायतीला (स्वशासन व्यवस्थेला) अत्यंत महत्त्व आहे. ही जातपंचायत ज्या ठिकाणी भरविली जाते ते ठिकाणही जमातीत अत्यंत पवित्र मानले जाते. जातपंचायत केवळ निवाडा देण्याचे कार्य करीत नाही, तर स्वजातीय स्त्री – पुरूषांना नैतिकता, एकनिष्ठता आणि सामाजिक बांधिलकी शिकविण्याची मोठी जबाबदारी पार पाडते. अवाढव्य नगदी दंड, अघोरी शिक्षा आणि वेगवेगळ्या प्रकारचे दिव्य यामुळे पारधी जमातीत जातपंचायतीचा विशिष्ट दरारा असे.

**संदर्भ :**


१. चव्हाण रामनाथ – भटक्या मुक्तांची जातपंचायत, देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स प्रा. लि., पुणे, दु. आ. २०१६, पृ. २२५.
२. बळे बाळासाहेब - पारधी समाज लोकजीवन आणि लोकसंस्कृती, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प. आ. ऑक्टो. २०१६, पृ. ७६.
३. तत्रैव, पृ. ७७.
४. तत्रैव, पृ. ७४.
५. चव्हाण रामनाथ - उ. नि. पृ. २३७.
६. राठोड भाऊसाहेब - पारधी लोकसंस्कृती, गोदा प्रकाशन औरंगाबाद, प. आ. ऑगस्ट २०१२, पृ. ५५.
७. तत्रैव, पृ. ५७.
८. माने लक्ष्मण – विमुक्तायन, मेहता पब्लिशिंग हाऊस प्रा. लि., पुणे, दु. आ. जून २०२३, पृ. १०३.
९. तत्रैव, पृ. १०३.
१०. राठोड भाऊसाहेब - उ. नि. पृ. ५७.
११. चव्हाण रामनाथ – उ. नि. पृ. २२६.
१२. तत्रैव, पृ. २२६.
१३. राठोड भाऊसाहेब – उ. नि. पृ. ५५.